महाराष्ट्र शासन
आयुक्त
**वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य**

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

DMER- २०२६-O/O COMMISSIONER/२०२६ /२५९३ दिनांक:- १७.०६.२०२६

**कार्यारंभ आदेश**

प्रति,

M/s Smart Services Pvt. Ltd.,
403, Western Court, Building D,
Opp. E-Square, Bhambhurda,
Shivaji Nagar, Pune – 411016.

विषय: शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय येथे बाह्यस्त्रोतामार्फत यांत्रिक वस्त्रधुलाई सेवा सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

संदर्भ:
१. शासन निर्णय संकिर्ण -०६२५/प्र. क्र. २१६/प्रशा-२, दिनांक. १०.०२.२०२६
२. संचालनालयाचे पत्र क्र. संवैशिवसं/यंसाख/निविदा स्वीकृती/६७५/२०२६, दिनांक ०८.०५.२०२६
३. संचालनालयाचे पत्र क्र. DMER -२०२६-O/O-Commissioner/२०२६/७७७, दिनांक २०.०५.२०२६
४. शासन पत्र क्र. संकिर्ण-०६२५/प्र. क्र. २१६/प्रशा-२, दिनांक ०५.०६.२०२६
५. संचालनालयाचे Letter of Intent: DMER/M&E PUR/Tender Acceptance/२३८९/२०२६, दिनांक ११.०६.२०२६

शासनाने वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील वस्त्रधुलाई यांत्रिक पध्दतीने बाह्यस्त्रोत सेवापुरवठादाराकडुन उपलब्ध करुन घेण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यास संदर्भ क्र.१ अन्वये मान्यता प्रदान केली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर BOOT पध्दतीने शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयातील वस्त्रधुलाई यांत्रिक पध्दतीने करण्यासाठी निविदा प्रसिध्द केली. सदर निविदेमध्ये तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेल्या निविदाकारांचा व्यापारी दराचा लिफाफा उघडल्यानंतर न्युनतम ठरलेल्या M/s. Smart Services Pvt. Ltd, Pune या कंपनीचा देकार प्रति किलो रु. ३२.९४/- (जी. एस. टी. वगळुन) शासनास मान्यतेकरीता दिनांक ०८.०५.२०२६ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला. शासनाने दिनांक ०५.०६.२०२६ अन्वये निविदेमध्ये न्युनतम ठरलेल्या M/s. Smart Services Pvt. Ltd, Pune यांनी सादर केलेला प्रति किलो रु. ३२.९४/- (जी. एस. टी. वगळुन) या देकारास मान्यता दिली आहे.

शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयात BOOT तत्वावर बाह्यस्त्रोतामार्फत यांत्रिक धुलाई सेवा सुरु करण्याकरीता खालील अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

१. यांत्रिक पध्दतीने वस्त्रधुलाई सेवा सुरु करण्याकरीता प्रकल्पाचा कालावधी **१० वर्षांचा** राहणार आहे. १० वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर शासन मान्यतेने आवश्यकता वाटल्यास २ वर्षाकरीता उक्त कामास मुदतवाढ देण्यात येईल.

२. सेवापुरवठादारास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर १० महिन्याच्या आत किंवा जागा उपलब्ध करुन दिल्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून ८ महिन्याच्या आत यांत्रिक पध्दतीने वस्त्रधुलाई सेवा सुरु करणे बंधनकारक राहिल.

३. सेवापुरवठादाराला वस्त्रधुलाई सेवा सुरु करण्याकरीता पायाभुत सुविधा उभारण्यासाठी संस्थेमध्ये जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

४. सेवापुरवठादाराने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत आवश्यकतेनुसार सर्व पायाभुत सुविधा उदा. यंत्रसामुग्री, उपकरण, मनुष्यबळ, साधनसामुग्री, नित्य उपयोगी वस्तु, विविध प्राधिकरणाच्या मान्यता स्वखर्चाने प्राप्त करावयाच्या आहेत.

५. सेवापुरवठादारास यांत्रिक पध्दतीने वस्त्रधुलाईकरीता संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या जागेच्या ठिकाणापर्यंत वीज व पाणी यांची सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहणार आहे. तथापि, यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा सुरु झाल्यावर सदर सेवांवर होणारा खर्च जसे की वीज, पाणी व तद्नुषंगिक हा सेवापुरवठादाराने करावयाचा आहे.

६. संचालनालयाच्या स्तरावरुन सेवापुरवठादारासोबत करण्यात आलेल्या सेवा करारानुसार सेवापुरवठादाराने यांत्रिक वस्त्रधुलाई सेवा सर्व संस्थांमध्ये कार्यान्वित करावयाची असून करारातील अटी व शर्ती, निविदेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या अटी व शर्ती आणि शुध्दीपत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे सेवापुरवठादारास बंधनकारक राहील.

७. सदर अटी व शर्तीचा भंग केल्यास सेवापुरवठारादासोबत करण्यात आलेला सेवा करार रद्द करण्यात येईल. सदर सेवाकरार रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांना राहतील.

८. निविदेतील अटी व शर्ती आणि सेवाकरारातील अटी व शर्तींचे पालन होत असल्याची पाहणी वेळोवेळी करण्याकरीता संबंधित संस्था प्रमुखांनी एका समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

९. सदर समन्वय अधिकारी यांनी सेवापुरवठादारामार्फत नियमभंग केल्यास निविदेतील अटी व शर्तीप्रमाण करावयाच्या दंडात्मक कार्यवाहीची शिफारस संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांना करावी.

१०. नियमाचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या दंडात्मक वसुलीची जबाबदारी संस्था प्रमुख यांची राहणार आहे. त्याकरीता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई यांच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

११. सेवापुरवठादारास यांत्रिक वस्त्रधुलाईकरीता **प्रति किलो रु. ३२.९४/- (जी. एस. टी. वगळुन)** इतका दर अनुज्ञेय राहणार असून प्रति किलो हे "Dry Weight" प्रमाणे असणार आहे.

१२. सेवापुरवठादाराच्या मनुष्यबळामार्फत रुग्णालय व महाविद्यालयामध्ये प्रतिदिनी वापरण्यात आलेले रुग्णांचे/कार्यालयीन कपडे (लिलन) सर्व विभागातुन संकलित करावयाची आहे. यांत्रिक वस्त्रधुलाई नंतर प्रत्येक विभागाला धुतलेले कपडे इस्त्री करुन पुन्हा परत करावयाचे आहेत.

१३. रुग्णालयीन कक्ष/शस्त्रक्रियागृह/ विभाग/कार्यालय इत्यादीकडुन प्राप्त करण्यात आलेले वस्त्र/कापड यांचे एकत्रित संकलन झाल्यानंतर एकाच ठिकाणी वजन करण्यात यावे. सदरचे वजन केलेल्या कापडाचे रुग्णालय प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत तपासणी/प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

१४. प्रतिदिनी यांत्रिक वस्त्रधुलाईमध्ये होणाऱ्या कामाचे लेखे स्वतंत्र ठेवायचे असून सदर लेखांची तपासणी सेवापुरवठादारास कोणतीही पूर्व कल्पना न देता संस्था प्रमुख यांनी करावयाची आहे. तसेच, केलेल्या पाहणीचा अहवाल आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांना महिन्यातुन एकदा सादर करावयाचा आहे.

१५. रुग्णालयीन वस्त्र/कापड या व्यतिरिक्त कोणतेही वस्त्रे/ कापड कार्यरत यांत्रिक वस्त्रधुलाई केंद्रामध्ये धुण्यात येणार नाही यांची खातरजमा रुग्णालय प्रशासनामार्फत करण्यात यावी. खाजगी स्वरुपात यांत्रिक वस्त्रधुलाई केंद्रामध्ये कपडयाची धुलाई करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास सदरचा करार रद्द करण्यात येईल.

१६. अस्वच्छ, इस्त्री न केलेली अथवा वस्त्रधुलाई प्रक्रियेमध्ये फाटलेली वस्त्र रुग्णालय प्रशासनामार्फत स्वीकारण्यात येणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी सेवापुरवठादाराची राहणार असुन त्याबाबत दंडात्मक कार्यवाहीची तरतुद निविदेच्या व कराररच्या अटी व शर्तीत समाविष्ट आहे.

१७. यांत्रिक वस्त्रधुलाई करीता वापरण्यात येणारे वीज व पाणी याचा अपव्यव होणार नाही याची सेवापुरवठादाराने दक्षता घ्यावी. तसेच, पारंपारिक ऊर्जा स्त्रोतासोबत अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करुन वीज बचतीबाबत उपाययोजना कराव्यात, Waste Water Management चा वापर करुन पाण्याचे नियोजन करावे.

१८. पाहणी अहवालामध्ये सेवापुरवठादाराने केलेले काम समाधानकारक असल्यास अथवा कोणत्याही दंडात्मक कार्यवाहीस सेवापुरवठादार पात्र नसल्यास सदर कामाचे देयक संस्था स्तरावरुन पारित करुन सेवापुरवठादारास प्रदान करावयाचे आहे.

१९. तथापी, सदर सेवेकरीता होणारा खर्च संस्थेच्या "(१०)- कंत्राटी सेवा" अंतर्गत उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

२०. प्रकल्प कालावधीत नवीन संस्थांचा समावेश करणे अथवा संस्था वगळण्याबाबतचे अधिकार शासन मान्यतेने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांना राहतील.

२१. निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे यांत्रिक वस्त्रधुलाईकरीता खरेदी करावयाचे यंत्र, साधनसामुग्री, केमिकल्स आणि डिटर्जन्स ISI, US FDA प्रमाणित असावित.

२२. सेवापुरवठादाराने निविदेमध्ये निर्धारित केलेले Washer Extractor, Tumbler Dryer, Steam Boiler/Thermic fluid Heater, Condensate Unit, Air compressor, DG set, Effluent Treatment cum Water Recycling Plant, Water Softener Plant, RO Plant, Linen handling equipment Model: Custom Made, PC workstation, All-in One Printer इत्यादी बाबी यांत्रिक वस्त्रधुलाईकरीता कार्यान्वित करावयाच्या आहेत.

२३. सदर यांत्रिक वस्त्रधुलाईवर होणारा खर्च वित्त विभाग दि. १७.०४.२०२१ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उपविभाग-४, अनुक्रमांक-१०, नियम क्रमांक ११ अंतर्गत प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार करण्यास शासनाने दि. ०५.०६.२०२६ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे, याची नोंद घ्यावी.

17.06.24

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष, मुंबई

प्रत माहितीस्तव

१. **मा. सचिव,** वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, ९ वा मजला, गो. ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.

२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

३. अधिष्ठाता,ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज जी समुह रुग्णालय, मुंबई

४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर

५. अधिष्ठाता, बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससुन रुग्णालय, पुणे

६. अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड

७. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई

८. अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातुर

९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला

१०. अधिष्ठाता, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

११. अधिष्ठाता, डॉ. वैशपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापुर

१२. अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर

१३. अधिष्ठाता, कर्मवीर मा. सां. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर

१४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गोंदिया

१५. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपुर

१६. अधिष्ठाता, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे

१७. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

१८. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व गो. ते रुग्णालय, मुंबई

१९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नाशिक

२०. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली

२१. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार

२२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रत्नागिरी

२३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

२४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव

२५. अधिष्ठाता, पद्मभुषण वसंतदादा पाटील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सांगली

२६. अधिष्ठाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती

२७. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज

२८. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, गडचिरोली

२९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग

३०. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती

३१. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, भंडारा

३२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बुलढाणा
३३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जालना
३४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, परभणी
३५. अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा
३६. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालये, बारामती, नांदेड, नागपुर, धाराशिव आणि जळगाव
३७. अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव, विलेपार्ले
३८. वैद्यकीय अधिक्षक, कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई
३९. सहयोगी प्राध्यापक, आर. ए पोद्दार महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई
४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४१. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, मुंबई